आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२९ मार्च २०२६ - रविवार

**ठळक बातम्या**

- पश्चिम आशियातल्या युद्धामुळे निर्माण झालेल्या आव्हानांना एकजुटीनं सामोरं जाण्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बातमधून आवाहन

- प्रसिद्ध उद्योगपती आणि रेमंड उद्योगसमूहाचे माजी प्रमुख विजयपत सिंघानिया यांचं निधन/ आज मुंबईत होणार अंत्यसंस्कार

- परदेशी गुंतवणूकदारांनी मार्च महिन्यात देशांतर्गत बाजारातून १ लाख १४ हजार कोटी रुपये काढून घेतले

- आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत  मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांचा सामना आज मुंबईत रंगणार

**आणि**

- राज्यात अनेक ठिकाणी वादळी पावसाची शक्यता / हवामान विभागाचा १३ जिल्ह्यांना ऑरेंज, तर १४ जिल्ह्यांना यलो अलर्ट

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या युद्धस्थितीमुळे निर्माण झालेल्या आव्हानांना एकजुटीनं सामोरं जाण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मन की बात मधून केलं. आकाशवाणीवरच्या  या कार्यक्रमाचा आज  १३२ वा भाग होता.

युद्ध ग्रस्त भाग ऊर्जा निर्मितीचं मोठं केंद्र आहे. यामुळेच सध्या जगभरात पेट्रोल आणि डिझेलची समस्या  निर्माण झाल्याचं ते म्हणाले.

**- -  होल्ड बाईट - YUDDHA RAJKARAN - - -**

आखाती देशांसह इतर देशांमध्ये एक कोटीपेक्षा जास्त भारतीय नागरिक राहत आहेत. त्यांना  मदतीचा हात दिल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी आखाती  देशांचे आभार मानले.

जनतेनं अफवांना बळी पडू नये आणि सरकारकडून मिळणाऱ्या अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असं त्यांनी सांगितलं. हा विषय १४० कोटी भारतीयांच्या हिताचा  असल्यानं

त्यात राजकारण करू नये असं ते म्हणाले. अफवा पसरवणारे लोक देशाचं नुकसान करत आहेत असं मोदी म्हणाले.

युवाशक्तीला अर्थसंकल्पाची प्रक्रिया आणि धोरणनिर्मितीशी जोडण्यासाठी 'माय भारत' संघटनेच्या वतीनं अर्थसंकल्पावर आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषेत देशभरातल्या १२ लाख युवा प्रतिनिधींनी सहभाग घेतल्याची माहिती त्यांनी दिली. या उपक्रमाअंतर्गत निवडलेल्या निबंधांमधून युवा वर्गानं राष्ट्रहिताचे अनेक मुद्दे मांडल्याचं त्यांनी सांगितलं. यातून देशाच्या विकासासाठी युवा वर्गाचा उत्साह दिसून येत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतला भारताचा विजय तसंच जम्मू काश्मीरनं प्रथमच रणजी चषक जिंकल्याचा उल्लेख करुन प्रधानमंत्र्यांनी क्रीडा क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेतला.

शिक्षण क्षेत्रातल्या अभिनव प्रयत्नांची माहितीही त्यांनी आजच्या भागात दिली.

आंतरराष्ट्रीय योग दिनाला शंभर पेक्षा कमी दिवस उरले असल्याचं सांगून, त्यांनी श्रोत्यांना आरोग्यवर्धनाबाबत माहिती दिली. आहारात साखरेचा वापर कमी करून, तसंच खाद्यतेलाच्या वापरात १० टक्के कपात करून आपल्याला जीवनशैलीशी संबंधित विकारांपासून दूर राहाता येईल असं ते म्हणाले.

मच्छिमार बांधव हे समुद्रावरचे योद्धे आणि आत्मनिर्भर भारताचा सशक्त पाया असून, त्यांच्या जीवनसुलभतेसाठी बंदरांचा विकास, विमा कवच आणि तंत्रज्ञानाचं सहाय्य, असे अनेक उपक्रम राबवले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. मत्सोद्योग क्षेत्रातल्या देशभरातल्या विविध नवोन्मेषी उपक्रमांची माहितीही त्यांनी दिली.

प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजनेचा प्रभाव देशाच्या कानाकोपऱ्यात दिसू लागला आहे. त्यामुळेच आता शहरात मोठ्या प्रमाणात घरांच्या छतांवर सौर पॅनल बसवलेले दिसतात असं त्यांनी सांगितलं. या योजनेचा लाभ ईशान्य भारतातल्या जनतेला मिळत असून, विजेच्या उपलब्धतेमुळे तिथल्या गावांमधला जीवनाचा दर्जा सुधारल्याचं ते म्हणाले.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर देशभरात जलसंरक्षणासाठी होत असलेल्या प्रयत्नांचा उल्लेख करून, जलसंवर्धनाचं महत्त्व त्यांनी अधोरेखित केलं. जल संरक्षणाचा आपला निर्धार व्यक्त करण्याचा हा काळ असल्याचं ते म्हणाले. अमृत सरोवर अभियानाअंतर्गत देशभरात

सुमारे ७० हजार अमृत सरोवरांची निर्मिती केली असून, पावसाळ्याआधीच त्यांच्या स्वच्छतेचं काम सुरु झाल्याची माहिती त्यांनी दिली.

'एक पेड माँ के नाम' या अभियानांतर्गत देशभरात कोट्यवधी झाडं लावली गेल्याची माहितीही त्यांनी दिली.

<><><><><>

प्रसिद्ध उद्योगपती आणि रेमंड उद्योगसमूहाचे माजी प्रमुख विजयपत सिंघानिया यांचं काल मुंबईत निधन झालं. ते ८८ वर्षांचे होते. लोकरी कपड्याच्या रेमंड या जगप्रसिद्ध ब्रँड बरोबरच पोलाद, सिमेंट, आणि कृत्रिम वस्त्रांच्या उद्योगात सिंघानिया यांनी वेगळं स्थान निर्माण केलं होतं.

कारखानदारीबरोबरच वैमानिक म्हणूनही त्यांनी नाव कमावलं होतं. लंडन ते नवी दिल्ली हा प्रवास मायक्रोलाईट विमानातून २३ दिवसात एकट्यानं करण्याचा विक्रम त्यांनी नोंदवला होता. तसंच वयाच्या ६७व्या वर्षी गरम हवेच्या बलूनमधून उड्डाण करण्याचा प्रयोग यशस्वी केला होता. हवाई दलानं त्यांना मानद एअर कमोडोर पद दिलं होतं, तर केंद्र सरकारने पद्मभूषण सन्मान प्रदान केला होता. २००६ मधे ते मुंबईचे नगरपाल होते. तसंच अहमदाबादच्या भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या संचालक मंडळावरही त्यांनी काम केलं होतं.

विजयपत सिंघानिया यांच्या पार्थिवावर आज दुपारी मुंबईच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येतील.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार आणि इतर मान्यवरांनी सिंघानिया यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

<><><><><>

परदेशी गुंतवणूकदारांनी मार्च महिन्यात देशांतर्गत बाजारातून १ लाख १४ हजार कोटी रुपये काढून घेतले आहेत. पश्चिम आशियातला चिघळलेला संघर्ष, रुपयातली घसरण आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती याचा परिणाम या महिन्यातल्या परदेशी ओघावर झाल्याचं तज्ज्ञांनी म्हटलं आहे. यापूर्वी परदेशी गुंतवणूकदारांकडून भारतीय बाजारातून ऑक्टोबर २०२४ मध्ये सर्वाधिक म्हणजे ९४ हजार १७ कोटी रुपये काढून घेतले गेले होते.

एनएसडीएलच्या आकडेवारीनुसार २०२६ मध्ये आतापर्यंत परदेशी गुंतवणूकदारांनी १ लाख २७ हजार कोटी रुपये काढून घेतले आहेत. फेब्रुवारी महिन्यात परदेशी

गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारात २२ हजार ६१५ कोटी रुपयांचा ओघ प्राप्त झाला होता. गेल्या १७ महिन्यातला हा उच्चांक होता.

**<><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या साखळी फेरीत आज मुंबईत वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात सामना होणार आहे. दोन्ही संघांचा हा सलामीचा सामना असेल. भारतीय प्रमाण वेळेनुसार संध्याकाळी साडेसात वाजता सामना सुरु होईल.

दरम्यान काल स्पर्धेच्या सलामीच्या सामन्यात गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं सनरायझर्स हैद्राबादवर ६ गडी आणि २८ चेंडू राखून विजय मिळवला.

**<><><><>**

मायामी खुल्या टेनिस स्पर्धेत, महिला एकेरीच्या अंतिम फेरीत बेलारूसच्या अरिना सबालेंकानं, अमेरिकेच्या कोको गॉफला 6–2, 4–6, 6–3 असं पराभूत करुन विजेतेपद पटकावलं. सनशाईन डबल पूर्ण करणारी पहिली तर हा किताब पटकावणारी पांचवी खेळाडू ठरली आहे. मयामी आणि इंडियन वेल्स या दोन्ही स्पर्धा जिंकणाऱ्यांना हा किताब दिला जातो. यापूर्वी स्टेफीग्राफ, किम क्लिस्टर्स, व्हिक्टोरिया अजारेंका आणि इगा स्वियातेक यांनी ही कामगिरी केली आहे.

पुरुष एकेरीत चेक खेळाडू जिरी लेहेकाचा सामना आज इटलीच्या जागतिक दुसऱ्या क्रमांकाचा खेळाडू जेनिक सिनर-शी, होणार आहे.

**<><><><>**

छत्तीसगढमधे रायपूर इथं पहिल्या खेलो इंडिया आदिवासी स्पर्धेत महाराष्ट्राच्या जलतरणपटूंनी १ सुवर्ण, ३ रौप्य आणि एका कास्य पदकाची कमाई केली. नागपूरच्या तन्वी धुर्वेने - सुवर्ण, पलाश ठाकुरने रौप्य आणि कास्य पदकं पटकावलं.

**<><><><>**

महिला लैंगिक शोषण प्रकरणी अटकेत असलेला भोंदू बाबा अशोक खरात, याची पोलीस कोठडी नाशिकच्या न्यायालयानं आज ३ दिवसांनी वाढवली. खरात याच्या विरोधात आणखी दोन महिलांनी तक्रार केली असून, तो चौकशीत सहकार्य करत नसल्यामुळे, त्याची

पोलीस कोठडी वाढवून मिळावी, अशी मागणी सरकारी वकिलांनी केली. त्यावर न्यायालयानं हा निर्णय दिला.

<><><><><>

५२ लाख रुपयांच्या महसूल थकबाकीमुळे जालना जिल्ह्यातल्या एका मल्टि मॉडेल ड्राय पोर्ट प्रकल्पाच्या ४९५ एकर जागेवर प्रशासनानं जप्ती आणली आहे. वसुलीसाठी अनेकदा नोटीस बजावूनही प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी उत्तर न दिल्याने तहसीलदार छाया पवार यांच्या नेतृत्वाखालच्या पथकानं काल जप्तीची कारवाई केली.  महसूलाच्या रकमेची थकबाकी भरल्यावरच ही जप्ती उठवली जाईल,असं प्रशासनानं सांगितलं. जवाहरलाल नेहरू बंदर प्राधीकरण आणि  नॅशनल हायवे लॉजिस्टिक्स मॅनेजमेंट लिमिटेड हे संयुक्तपणे या प्रकल्पाचा विकास करत होते.

<><><><><>

लातूर जिल्ह्यात उदगीर शहराजवळ काल संध्याकाळी रस्त्यावरून चालणाऱ्या म्हशींना  एका जीपने जोरदार धडक दिली. या अपघातात १ म्हैस दगावली, तर २ म्हशी गंभीर जखमी झाल्या. पोलिसांनी संबंधित शेतकऱ्याच्या नुकसानीचा पंचनामा केला असून, पुढली कार्यवाही सुरु आहे.

<><><><><>

शेकडो वर्षांची परंपरा असलेला नाशिकचा श्रीराम रथोत्सव आज साजरा होत आहे. राम नवमीला राम जन्मोत्सवानंतर कामदा एकादशीला श्री राम रथ ओढण्याची परंपरा आहे.

<><><><><>

वाशीम जिल्ह्यात येत्या 21 एप्रिल पासून ‘पासपोर्ट मोबाईल व्हॅन’ सेवा सुरू होणार आहे. जिल्ह्यात पासपोर्ट सेवा केंद्र नसल्यामुळे नागरिकांना पासपोर्ट संबंधित कामांसाठी हिंगोली, अकोला किंवा अमरावती इथं जावं लागत होतं. या मोबाईल व्हॅनमुळे पासपोर्टशी संबंधित सर्व प्रक्रिया वाशीम मधेच पूर्ण होतील.

<><><><><>

राज्यात सर्वत्र येत्या २ दिवसात  तुरळक  ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडेल तसंच सोसाट्याचे वारे वाहतील. काही टिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. मुंबई

आणि ठाणे जिल्ह्यात तुरळक ठिकाणी हलका पाऊस होईल. जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, लातूर, आणि धाराशिव, या जिल्ह्यांना हवामान विभागाने वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. यवतमाळ, वर्धा, नागपूर, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, नांदेड, हिंगोली, कोल्हापूर, नंदुरबार, धुळे, सिंधुदुर्ग, आणि रायगड या जिल्ह्यांना यलो अलर्ट दिला आहे.

**//<><><><><>//**